# रंगभूमीचं स्वरूप सतत बदलत राहील !

**दाजी भाटवडेकर**

जो पर्यंत मानवजात जिवंत आहे तोपर्यंत रंगभूमी जिवंत राहणार, फक्त स्वरुप मात्र बदललेलं असेल. पुढील शंभर वर्षे मराठी रंगभूमी टिकेल का, हे आत्ता सांगता येणार नाही. कारण माणसंच एव्हढी बदलत चालली आहेत की आजचा उद्या दिसत नाही, उद्याचा परवा दिसत नाही. आता सोसायट्या किती बदलल्या आहेत. पूर्वी वर्णाश्रम होता. तो आता नाहीसा झालाय. माणसाची जात, त्याचा धर्म कोणताही असला तरी तो माणुसकीनं वागतोय की नाही हे बघितलं पाहिजे. जर माणूस हा माणूसच राहिला तर त्याच्या गरजा शंभर वर्षानंतरही त्याच राहणार. पण तेव्हा काय होईल हे आत्ताच कसं सांगायचं?

माझ्या कल्पनेप्रमाणे आजची जी संगीत रंगभूमी आहे ती बहुतेक असणार नाही. निदान आत्ता ती जशी आहे तशी तरी नक्कीच राहणार नाही. ज्यांना संगीत रंगभूमीचं मानदंड मानलं जातं अशा किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, कोल्हटकर, गडकरी यांनी लिहिलेली सौभद्र, संशयकल्लोळ, विद्याहरण, स्वयंवर, एकच प्याला, मानापमान ही नाटकं तरी आता कुठे केली जातात? आपल्याला ती नाटकं आज पहायला मिळतात का? ह्या पाच नाटककारांनंतर रांगणेकरांच्या 'नाट्यनिकेतन' संस्थेनं संगीत रंगभूमीवर थोडासा बदल केला. संगीत रंगभूमीला सुटसुटीत केलं; त्याला आधुनिक रुप देण्याचा प्रयत्न केला. साहित्यसंघानं आपल्या वार्षिक नाट्य- महोत्सवात जुनी नाटकं तर केलीच पण नवीन नाटकंही लिहून घेतली. जयराम शिलेदारांची 'महाराष्ट्र रंगभूमी', 'भरत नाट्य मंदिर', 'ललितकला दर्शन' ह्या संस्थांनी संगीत अनुरुप अशी नाटकं लिहून घेतली, त्यात विद्याधर गोखले यांचं योगदान प्रचंड आहे. चित्तरंजन कोल्हटकरांच्या संस्थेने 'भावबंधन', 'एकच प्याला' ही गडकरींची नाटके खूप काळ चालवली पण आत्ता ती नाटकं दाखवता येत नाहीत. साहित्य संघाने आत्ता आत्ताच सावरकरांचं 'संन्यस्त खड्ग' हे नाटक नवीन संचात काढलं. पण त्याला प्रेक्षकांचा म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. नेहरू सेंटरचे काझी यांनी लिहिलेले सैगलच्या जीवनावरचे 'संगीत शापित गंधर्व' हे नाटक नेहरू सेंटरने रंगभूमीवर आणले. या नाटकाला आशा खाडिलकर यांनी संगीताचा साज चढविला होता आणि पेंढारकर मंडळींनी त्यात कामं केली होती. पण त्याचेसुद्धा अगदी तुरळक प्रयोग झाले. डॉ. रवीन्द्र घांगुर्डे आणि वंदना घांगुर्डे यांच्या 'नादब्रह्म' संस्थेने जुनी संगीत नाटके करण्याची प्रथा चालू ठेवली आहे. ही नाटके ते गावोगावी करतात. 'रंगशारदा' आणि 'साहित्य संघ' या दोन्ही संस्था साभिनय सवेष नाट्यसंगीत प्रशिक्षण योजना राबवताहेत. पण आता रेडिओवर, दूरदर्शनवर इतकं संगीत ऐकायला आणि पहायला मिळतं की संगीत ऐकण्यासाठी मुद्दाम संगीत नाटकाला जायची जरुरच राहिली नाही.

पूर्वी नटाला समोर ठेवून नाटकं लिहिली जात असत. प्रेक्षक बालगंधर्वांना पहायला जायचे. नानासाहेब फाटकांना, मामा पेंडसेंना, मास्टर दत्तारामांना पहायला जायचे, पण आज प्रेक्षक नटांना नाही तर नाटकच पहायला जातोय. संगीत रंगभूमीबद्दल एक विचार असाही येतो की संगीत आणि अभिनय या दोन्ही बाबतीत श्रेष्ठ आणि आत्ता ह्यात असणारे जेष्ठ